Jagdamba Education Society's

# Santosh N. Darade Polytechnic

At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

## * Central Library *

Accredited by
NATIONAL BOARD OF ACCREDITATION

Please Consider the Environment Before Printing…

**Date: 13/10/2025**

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

### News Paper Name: आपलं महानगर

**Page No. 04**

आपल्या वाटल्या, आतल्या वाटल्या... आपलं महानगर | My महानगर.com www.mymahanagar.com

## दिनविशेष



### अष्टपैलू अभिनेते, निर्माते अशोककुमार

अशोककुमार हे हिंदी चित्रपटसृष्टीतील अष्टपैलू अभिनेते व निर्माते होते. त्यांचे मूळ नाव कुमुदलाल (कुमुदकुमार) कुंजलाल गांगुली. चित्रपटसृष्टीत त्यांना आदराने दादामुनी म्हणत असत. त्यांचा जन्म १३ ऑक्टोबर १९११ रोजी बिहार राज्यातील भागलपूर येथे एका मध्यमवर्गीय बंगाली कुटुंबात झाला. त्यांचे वडील कुंजलाल हे व्यवसायाने वकील होते. तर आई गौरीदेवी या सधन कुटुंबातील होत्या. हिंदी चित्रपटसृष्टीतील पार्श्वगायक व अभिनेते किशोरकुमार व अभिनेते अनूपकुमार हे अशोककुमार यांचे लहान बंधू. त्यांच्या बहिणीचे नाव सतीदेवी. वडिलांच्या वकिली व्यवसायामुळे गांगुली कुटुंब खांडवा (मध्य प्रदेश) येथे स्थायिक झाले. तेथेच अशोककुमार यांचे प्राथमिक शिक्षण झाले. कलकत्त्याच्या (आताचे कोलकाता) प्रेसिडेन्सी कॉलेजमधून त्यांनी कायद्याची पदवी घेतली.

अशोककुमार यांचे चित्रपट दिग्दर्शक म्हणून काम करण्याचे बालपणापासूनचे स्वप्न होते. अलाहाबाद विद्यापीठात शिक्षण घेत असताना त्यांची मैत्री शशधर मुखर्जी यांच्याशी झाली. १९३४ च्या सुमारास न्यू थिएटरमध्ये प्रयोगशाळा तंत्रज्ञ म्हणून काम करीत असतानाच निर्माते शशधर मुखर्जी यांनी अशोककुमार यांना बॉंबे टॉकीज या चित्रपट निर्मिती संस्थेत बोलावून घेतले. तेथे सहायक तंत्रज्ञ म्हणून काम करत असताना बॉंबे टॉकीजचे मालक हिमांशू रॉय यांनी अशोककुमार यांना 'जीवन नैय्या' या चित्रपटामध्ये अभिनेता म्हणून काम करण्याचा प्रस्ताव दिला (१९३६). हा त्यांचा पहिला चित्रपट. १९३६ ला बॉंबे टॉकीजचीच निर्मिती असलेल्या 'अछूत कन्या' या चित्रपटात त्यांनी ब्राह्मण युवकाची भूमिका केली. त्यानंतर अशोककुमार यांनी बॉंबे टॉकीजच्या इज्जत (१९३७), सावित्री (१९३८), निर्मला (१९३८) अशा अनेक चित्रपटांत अभिनेत्री देविका राणी यांच्यासोबत काम केले. ते चित्रकारही होते. तसेच अनेक भाषांचा त्यांचा अभ्यास होता. हिंदीसहित काही बंगाली व मराठी चित्रपटांतही त्यांनी काम केले. १९९७ साली प्रदर्शित झालेला 'आँखो में तुम हो' हा त्यांचा शेवटचा चित्रपट होय. अशोक कुमार यांचे १० डिसेंबर २००१ रोजी निधन झाले.

Nashik Edition
Oct 13, 2025 Page No. 4
Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

Jagdamba Education Society's
SND POLYTECHNIC
KNOWLEDGE PERSPECTIVE UNDERSTNING

| | |
|---|---|
| LIBRARIAN<br>MR.U.D. MULANI<br>SND POLYTECHNIC<br>YEOLA-423401 | PRINCIPAL<br>PROF.U.B JADHAV<br>SND POLYTECHNIC<br>YEOLA-423401 |